**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य ) ,पुणे

दूसरा व तिसरा मजला,नवीन प्रशासकीय इमारत , विधान भवन समोर ,कॅम्प,पुणे 1

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११०Email ID :**dlrmah.mah@nic.in **Web site :** https://mahabhumi.gov.in

क्र.रा.का.आ.अ.भू.4/मागणी/निश्चिती/2022
दिनांक : 31/10/2022

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय:- १ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली मागणी नुसार ऑनलाईन ई-चावडी पोर्टल मार्फत जमीन महसूल वसुली करणेबाबत,

संदर्भ:- १.इकडील कार्यालयाचे पत्र क्र.रा.का.आ.अ.भू.४/गा.न.नं.१ ते २१ अद्यावतीकरण/२०२२, दिनांक: १२/०८/२०२२

ई-फेरफार प्रकल्पा अंतर्गत ई-चावडी प्रणालीचे विकसनाचे कामकाज या कार्यालयाचे स्तरावर चालू आहे. ई-चावडी पूर्वतयारीच्या सर्वसमावेशक सूचना देऊन संदर्भीय पत्रात नमूद केलेप्रमाणे अष्ट सूत्री कामकाज पूर्ण असणाऱ्या गावांसाठी ई-चावडी प्रकल्प कार्यान्वित करणेसाठी आवश्यक अकाउंट व लॉगीन क्रेडेन्शियल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सध्या राज्यभरात ई-चावडी प्रणालीमध्ये ऑनलाईन डेटा एन्ट्री चे कामकाज चालू असून अनेक जिल्ह्यातून त्याच्या जिल्ह्यातील काही गावामध्ये डेटा एन्ट्री पूर्ण झाली असल्याने वसुलीची कार्यवाही ऑनलाईन करणे बाबत विचारणा होत आहे. १ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली मागणी नुसार करावयाची जमीन महसूल वसुली बाबत खालील निर्देश देण्यात येत आहे.

१.ज्या गावांची १ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली मागणी हि थकबाकी विचारात घेऊन हस्तलिखित मागणी सोबत खातेदार निहाय तंतोतंत जुळते अशा गावां बाबत संबंधित तालुका तहसीलदार यांनी आकारणी तंतोतंत जुळते याबाबत खात्री करून अहवाल (प्रमाणपत्र-सोबत नमुना)संबधित जिल्हाधिकारी यांच्या कडे सादर करावा.जिल्हाधिकारी यांनी या अहवाला नुसार पळताळणी करून योग्य असल्यास ती गावे ई-चावडी पोर्टलद्वरे वसुली करण्यासाठी योग्य असल्याचे घोषित करावे. तसेच अशा गावांचा अहवाल राज्य समन्वयक, जमाबंदी आयुक्त कार्यालय ,पुणे यांच्या कडे पाठवावा. व अशा सर्व गावात ई-चावडी पोर्टलद्वरे ऑनलाईन पावती डाउनलोड व वसुली नंतर चलन भरणा नोंदणी कार्यवाही सुरु करता येईल.

२.ज्या गावांचे वसुलीचे कामकाज यापूर्वी करण्यात आलेले आहे. व आता सदर गावांची ई-चावडी पोर्टलवरील मागणी आणि हस्तलिखित मागणी खातेदार निहाय तंतोतत जुळत आहे, त्या गावात देखील अशी घोषणा करता येईल. व उर्वरित खातेदारनिहाय वसुलीचे कामकाज (पावती डाउनलोड व चलन भरणा) करता येईल.तथापि या गावांकरीता ही घोषणा करण्या पूर्वी करण्यात आलेली वसुली ई-चावडी पोर्टलवर पावत्या डाउनलोड करून नोंदविणे आवश्यक राहील.अशा पावत्याची भरणा केलेली चलन ई-चावडी प्रणालीत अपलोड करणे देखील आवश्यक राहील.सदर पोर्टल वरील पावत्या या पुढील तारखेच्या असल्या कारणाने लेखापरीक्षणसाठी विचारात घेतल्या जाणार नाही. लेखापरीक्षणसाठी घोषणापुर्वी वसुलीच्या खातेदार निहाय ऑफलाईन (गाव नमुना नऊ आणि नऊ-अ) पावत्या आणि चलन तलाठी यांनी जतन करावव्यात.या प्रक्रियामुळे गाव ई-चावडी पोर्टलवर दाखल होईल,घोषणेनंतर ऑनलाईन पोर्टलचा वापर करून काढलेल्या सर्व पावत्याचे क्रमांक हे ई-चावडी पोर्टलवर लेखापरीक्षणसाठी उपलब्ध असतील आणि पूर्वीचे पावती नुसार चलने उपलब्ध असतील याद्वारे ऑफलाईन व ऑनलाईन कामकाज करूनही गावाचे गाव नमुना आठ-ड (कॅशबुक) हा स्वयं:अद्ययावत होईल.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेसाठी आपल्या स्तरावरून सर्व जिल्हाधिकारी, निवासी /उपजिल्हाधिकारी ( DDE ),तहसीलदार यांना आपल्यास्तरावरून आदेश/सूचना निर्गमित करण्यात यावे.तसेच वेळोवेळी ई-चावडी पोर्टलवर दाखल झालेल्या गावांचा तालुकानिहाय आढावा होणेबाबत जिल्हाधिकारी यांना सूचित करावे.

Signed by Niranjan K
Sudhansu
Date: 27-11-2022 21:29:03
Reason: Approved

**(निरंजन सुधांशु)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक,**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे**

**१ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली मागणी नुसार ऑनलाईन ई-चावडी पोर्टल मार्फत जमीन महसूल**
**वसुली करणेबाबत,**

**संदर्भ :- १.मा.जमाबंदी आयुक्त,पुणे यांचे क्र.रा.भू.अ.आ.का.4/गा.न.नं.1ते21 अदययावतीकरण /२२ दिनांक १२/०८/२०२२**

## प्रमाणपत्र

मौजे ---------------------ता.--------------------जिल्हा ---------------------- येथील १ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली मागणी हि थकबाकी विचारात घेऊन हस्तलिखित मागणी सोबत खातेदार निहाय तंतोतंत जुळते,त्याकरिता हस्तलिखित गाव नमुना आठ-ब आणि आठ-क नुसार तपासणी करण्यात आले आहे.

करीता प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :- -------------------------

तहसीलदार,---------------